# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०२/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा उमठा येथे फिर्यादी नामे— राजेश अशोकराव ठाकरे, वय ४० वर्ष रा. रामठी. ता.नरखेड. जि.नागपूर हे आरोपी नामे— जिवन भाउसाहेब पवार, वय २८ वर्ष रा. उमठा ता.नरखेड.जि. नागपूर यांच्या कडे मजूरीचे काम करीत असुन दि. २३/०८/२०२२ चे २०.०० वा. चे दरम्यान आरोपीने त्यांना मजूरीचे पैसे न देता तसेच 'चोरुन दारु का पीला' याकारणावरुन चप्पलीने फिर्यादिस गालावर मारहाण केली. तसेच आरोपीने फिर्यादीचा पॅन्ट खाली काठून मागील बाजुस थोडे पेट्रोल टाकले त्यामूळे फिर्यादीचा मागील बाजुला ठिक ठिकाणी जळालेला असुन जांगेजवळ देखील जळालयाचा चट्टा पडला आहे. तसेच आरोपीने जिवानीशी मारण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. मनोज शेंडे मो.नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा पवनी येथे दिनांक २०/०८/२२ ते ०१/०९/२२ चे १०.०० वा. सुमारास २०१७ मध्ये महाराष्ट्र शासन तर्फे जमाती विकासाचा कुटुबांना घरूगुती गॅस युनीट पुरवण्याचा योजनेतील गॅसच्या शेगडया धान खरेदी केन्द्र पवनी येथे आल्या होत्या. अशा एकुण ३८८ गॅस शेगडया व वजन काटे हे पवनी येथील धान खरेदी येथे ठेवण्यात आले होते. फिर्यादी यांनी धान खरेदी करीता ठेवलेलले गॅस शेगडी व वजन कोटे पाहीले असता फिर्यादीस अस्त—व्यस्त दिसले. तसेच सदर कार्यालयाची मागील खिडकी ही तुटलेली दिसली. यावरून फिर्यादीने गॅस शेगडया मोजुन पाहीले असता त्यात ३८८ गॅस शेगडया पैकी ६५ गॅस शेगडया किमती ५००/—रू. असा एकुण कि. ३२,५००/—रू. व १० इलेक्ट्रीक काटया पैकी ०४ वजन काटे प्रत्येकी ५०० रू प्रमाणे २,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आले नाही असा एकुण कि. ३४,५००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुरेश रोभानलाल पटले वय ३६ वर्ष रा सितापुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि धोडके मो.क्रं. ८१७७९०७००४ या करीत आहे.

२) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील पिपळा डाक बंगला येथे दिनांक ३०/०८/२२ ते ०१.१५ वा. ते ०२.१५ वा. सुमारास अज्ञात आरोपीने पिपळा डाकबंगला येथील BSNL टॉवरचे बॅटरी रूमचे चैनलगेट व दाराचे लॉक तोडुन आत मधील बैटरी बॉक्स मधुन अमरराजा कपंनीच्या १२ बैटरी किं १५,०००/—रू., BTS बॉक्स मधील ०६ कार्ड कि. १०,०००/—रू. असा एकुण २५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अजय लक्ष्मण कनोजीया वय ४५ वर्ष रा. फलॅट नं २०४ गोकुल हाउसिंग सोसयटी गोरेवाडा, रोड नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनि श्री नामदेव धांडे मो.क्रं. ९७६४४०१२४६ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापा :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील गोसेवाडी रेती घाट येथे दिनांक ३१/०८/२२ चे २३.०० वा. पासून ०१/०८/२२ चे २३.३० वा. पर्यंत तहसिलदार सावनेर यांना गोपनीय माहीती मिळली की, मोजा गोसेवाडी कन्हान नदी घाट येथे कन्हान नदी रेती घाट येथून अवैध रित्या रेती उत्खनन होत आहे. यामाहिती वरून फिर्यादी व त्यांचे इतर सहकार्य यांचेसह गोसेवाडी घाट येथे गेले असता त्यांना पाहून ट्रॅक्टर चालकांनी त्यांचे ताब्यातील ट्रॅक्टर जंगलामध्ये नेवून लपवून ठेवले. सदरहू चालकाचा शोध घेतला असता जंगल परिसरात ट्रॅक्टरचा चालक १. दिनेश पंजाबरात कान्हारकर, वय ३५ वर्ष, रा. गोसेवाडी यांचा ट्रॅक्टर क्र. एमएच— ४०/सीए— ७८१८ किमती ५,००,०००/— रू., २. नंदकिशोर कान्हारकर वय ३२ वर्ष, रा.गोसेवाडी याचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर किमती ६,५०,०००/—रू., ३. सुभाष मारोती कान्हारकर, वय ४० वर्ष, रा. गोसेवाडी याचा एम. एच—४०/एल—२३६० किमती ५,००,०००/—रू., ४. सुरज मधुकर कान्हारकर, वय ३० वर्ष, रा. गोसेवाडी यांचे विना क्रमांकाचा ट्रॅक्टर किमती ४,५०,०००/—रू., ५. ट्रक क्र. एम.एच— ४०/एफ—२३६० किमती १,४०,०००/—रू. हे मिळुन आले. सदरचे ट्रॅक्टर आरोपीतांनी पोस्टे खापा येथे जमा केले. सदर ट्रॅक्टर पैकी एका ट्रॅक्टर मध्ये ०१ ब्रास रेती किंमत २,०००/—रू. वाहनासह जप्त केली.

सदर प्रकरणी सरतर्फे मनोज महादेव रामटेके वय ४० वर्ष तलाठी साझा क्र. ४० वाकी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ३९, १९२ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर मो.क्र. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**